ePaper **देशासह राज्यात उष्णतेची लाट, शाळांच्या वेळेत बदल; उष्णतेच्या लाटेचा इशारा**



| वर्ष - 8 | अंक - 258 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | शनिवार, दि. 12 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- कोलकाताने उडवल्या चेन्नईच्या चिंधड्या
- मुलाच्या आठवणीत शिखर धवन भावूक
- आयातशुल्क : चीन अडचणीत?
- उत्तर प्रदेशात अवकाळी पावसाचा कहर



ePaper
वर्ष - 8 । अंक - 258 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™

# देशासह राज्यात उष्णतेची लाट, शाळांच्या वेळेत बदल; उष्णतेच्या लाटेचा इशारा



## आतील पानांत


- कोलकाताने उडवल्या चेन्नईच्या चिंधड्या
- मुलाच्या आठवणीत शिखर धवन भावूक
- आयातशुल्क : चीन अडचणीत?
- उत्तर प्रदेशात अवकाळी पावसाचा कहर


www.mahaenews.com | शनिवार, दि. 12 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, चिदंबरम् यांची बेताल वक्तव्ये..

# आधी काँग्रेस वाडा पडका, त्यात 'मेंदू' निघाला सडका !

## 'या काँग्रेस नेत्यांना जोड्याने मारले पाहिजे ; विरोधकांची घणाघाती टीका !

। कराड / नागपूर/ चेन्नई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचा वाद आता आणखी चिघळला असून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी थेट मंगेशकर कुटुंबीयांवर आरोप केले असून त्यांचा उल्लेख 'दरोडेखोरांची टोळी' असा केला आहे. त्यामुळे सगळीकडे संतापाची लाट उमटली आहे. निवडणुकीमध्ये मतदारांनी काँग्रेस पक्षाला त्यांची जागा दाखवली असून त्या पडक्या वाड्यातील सदस्यांचा मेंदूसुद्धा आता सडका झाला आहे, असे म्हणण्याची वेळ आली आहे.**



विजय वडेट्टीवार
(काँग्रेसचा भंपक नेता)



पृथ्वीराज चव्हाण
(मूर्खपणाचे उद्गार)




पी. चिदंबरम्
(भाजप द्वेषाकडून भारत द्वेषाकडे)

### पृथ्वीराजबाबा, चिदंबरम् यांचे डोके फिरले !

मंगेशकर कुटुंबीयांबाबत वडेट्टीवार यांचे भंपक वक्तव्य चर्चिले जात असतानाच दुसरीकडे, मुंबई बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी तहव्वूर राणा याला भारतात आणले गेले असून त्याची बाजू घेऊन नरेंद्र मोदी सरकारवर टीका करणाऱ्या काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण आणि पी. चिदंबरम् यांच्यावरही विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे.

### उपमुख्यमंत्री अजितदादा संतापले..

वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांवर 'लुटारूंची टोळी' असा उल्लेख केल्यामुळे अजितदादा पवार चांगलेच संतापले आहेत. ते म्हणाले, की मंगेशकर कुटुंबाचे योगदान केवळ भारतातच नव्हे, तर जगाला माहीत आहे. त्यांनी वडेट्टीवार यांच्या वक्तव्याचा निषेध केला आणि मंगेशकर कुटुंबीयांनी संगीत आणि कलाक्षेत्रात केलेल्या अतुलनीय कार्याचा गौरव केला. अजित पवारांनी थेट प्रतिक्रिया देत वरील आरोपांना निराधार ठरवले आहे.



### सत्ता गेल्यामुळे काँग्रेस सैरभैर..

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये गर्भवती महिलेला उपचाराअभावी मृत्यू आला, या संदर्भात वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबियांना जबाबदार धरले आहे. त्यांनी आरोप केला आहे, की मंगेशकर कुटुंबांचे गाणे म्हणण्यापलीकडे काहीही योगदान नाही. ज्यांनी ऑटोग्राफसाठी पैसे घ्यावेत, त्यांच्याकडून काय योगदानाची अपेक्षा ठेवायची? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. पैसे घेऊन गाणे म्हटले म्हणजे योगदान नाही. लोकांची सेवा कुठे असेल, तर ते योगदान होईल. माझ्या २५/३० वर्षांच्या आमदारकीच्या काळात मी त्यांच्या योगदानाबद्दल कधीही ऐकले नाही, असेही भंपकपणाचे वक्तव्य वडेट्टीवार यांनी केले आहे.

### "वडेट्टीवारांचे वक्तव्य मूर्खपणाचे.."

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीय म्हणजे दरोडेखोर आहेत, असे जे वक्तव्य केले आहे, त्याबद्दल तीव्र पडसाद उमटत आहेत. त्यांचे बोलणे हे मूर्खपणाचे आहे, अशी प्रतिक्रिया बहुतेक राजकारण्यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी वडेट्टीवार यांचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. त्यांचे मित्र पक्ष असलेल्या उबाठा गटाने तसेच शरद पवार गटानेही निषेध केला असून वडेट्टीवार यांनी मंगेशकर कुटुंबीयांची माफी मागावी, अशी सर्वांची मागणी आहे.

### काय म्हणाले पी. चिदंबरम्...

माजी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम् यांनी दहशतवादी तहव्वूर राणाच्या प्रत्यारोपणाचे श्रेय मोदी सरकारचे नाही, तर डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात 'युपीए' सरकार असताना ही पूर्वतयारी करण्यात आली होती. त्यामुळे, आज राणाचे प्रत्यार्पण शक्य झाले आहे, असे त्यांनी उद्गार काढले. या प्रत्यार्पणामागे मोदी यांचा काहीही संबंध नाही, असे चिदंबरम म्हणाले.

### पृथ्वीराज चव्हाण यांचे तिसरेच..

कुख्यात राणा याला भारतात आणले गेले आहे, पण त्याने अजून त्याच्यावरचे आरोप मान्य केलेले नाहीत, याचा भारतीय न्यायव्यवस्थेने विचार करायला हवा. राणा याला आणल्यानंतर जणू काही तो फाशीचा आरोपी आहे, अशा थाटात मोदींचे समर्थक जल्लोष करीत आहेत, याचा त्यांनी निषेध केला.

# ‘फुले’ चित्रपटाला विरोध अनाठायी!

## महात्मा फुले यांचा लढा ब्राह्मण्याविरोधात; भुजबळ यांची भूमिका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपण इतिहास विसरत चाललो आहोत. महात्मा फुले यांचे लेखन हे त्या वेळच्या कर्मठ ब्राह्मणांविरोधात आहे. त्यांचा लढा ब्राह्मणांविरोधात नाही, तर ब्राह्मण्याविरोधात आहे. हे जाणून घेण्यासाठी ‘फुले’ चित्रपट सर्वांनी पाहिला पाहिजे. जातीयवाद करून इतरांना कमी लेखणाऱ्यांसाठी हा चित्रपट आवश्यकच आहे. चित्रपटाला अनाठायी विरोध करण्यापेक्षा त्या वेळचा इतिहास समजून घेतला पाहिजे,’ अशी भूमिका महात्मा फुले समता परिषदेचे अध्यक्ष आणि माजी मंत्री छगन भुजबळ यांनी शुक्रवारी मांडली.**



राज्य शासनाच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या वतीने महात्मा फुले जयंतीनिमित्त फुले वाडा येथे झालेल्या कार्यक्रमात ‘समग्र महात्मा जोतिबा फुले’ आणि ‘समग्र सावित्रीबाई फुले’ या ग्रंथांचे प्रकाशन छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि आमदार हेमंत रासने या वेळी उपस्थित होते.भुजबळ म्हणाले, ‘स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे महात्मा फुले यांना विरोध करण्यामध्ये केवळ कर्मठ ब्राह्मणच नव्हते, तर आमच्यातील काही अंधश्रद्ध लोकही होते. फुले यांना मदतही काही ब्राह्मणांनीच केली होती. समाजामध्ये आता प्रचंड बदल होत आहेत, ही चांगली गोष्ट आहे. तरी इतिहास जाणून घेतलाच पाहिजे. महिला आज सर्व क्षेत्रांत यश संपादन करत आहेत, त्याची सुरुवात इथून झाली. फुले यांचा लढा ब्राह्मणांविरोधात नाही, तर ब्राह्मण्याविरोधात आहे. आचार्य अत्रे यांनी फुले यांच्यावर ‘महात्मा’ चित्रपट निर्माण केला, त्याला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. त्यांच्या कार्यावर आधारित ‘सत्यशोधक’ चित्रपट निघाला. आताही ‘फुले’ या हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली आहे. ‘आम्ही कोणतेही स्वातंत्र्य घेतले नाही’ असे फुले चित्रपटाच्या निर्मात्यांनी मला सांगितले.’महात्मा फुले वाडा आणि सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह या वास्तू एकाच प्रांगणात याव्यात, यासाठी फार प्रगती होऊ शकलेली नाही. त्यासाठी जागा देण्यास येथील नागरिक तयार आहेत. अजित पवार आणि चंद्रकांत पाटील या दोन्ही ‘दादां’नी त्यामध्ये पुढाकार घ्यावा,’ असे आवाहनही भुजबळ यांनी केले. शरद पवार मुख्यमंत्री असताना समग्र फुले वाङ्मय प्रकाशित झाले होते. आता फडणवीस मुख्यमंत्री असताना त्याचे पुन्हा प्रकाशन होत आहे, याचा आनंद असल्याची भावना भुजबळ यांनी व्यक्त केली.‘दोनशे कोटी देऊनही भूमी अधिग्रहण होऊ शकले नाही. १७ तारखेला आयुक्तांबरोबर बैठक घेऊन महात्मा फुले वाडा आणि सावित्रीबाई फुले स्मारक सभागृह एकत्र आणण्यासाठी प्रयत्न करू,’ असे पाटील म्हणाले. ‘प्रकाशित झालेल्या ग्रंथाची छापील किंमत ४०० रुपये असली, तरी सवलतीच्या दरामध्ये ५० रुपयांना ग्रंथाची विक्री केली जाणार आहे,’ असेही त्यांनी नमूद केले.महात्मा फुले यांनी त्यांच्या लेखनातून सत्य मांडले. सत्य लपवून काही होत नसते. महात्मा फुले जयंतीनिमित्त फुले वाडा येथे झालेल्या कार्यक्रमात ‘समग्र महात्मा जोतिबा फुले’ आणि ‘समग्र सावित्रीबाई फुले’ या ग्रंथांचे प्रकाशन छगन भुजबळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

### केवळ कर्मठ ब्राह्मणच नव्हते

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि आमदार हेमंत रासने या वेळी उपस्थित होते. भुजबळ म्हणाले, ‘स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे महात्मा फुले यांना विरोध करण्यामध्ये केवळ कर्मठ ब्राह्मणच नव्हते, तर आमच्यातील काही अंधश्रद्ध लोकही होते.

# गर्भवती मृत्यूप्रकरणी पालिकेचा अहवाल

## माता मृत्यू अन्वेषण समितीकडून उपचारातील विलंबाची तपासणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ईश्वरी (तनिषा) भिसे या गर्भवतीच्या मृत्यूची चौकशी महापालिकेची माता मृत्यू अन्वेषण समितीने केली होती. रुग्णाला रुग्णालयात दाखल करण्यास, तिला दुसऱ्या रुग्णालयात हलविण्यास आणि तिच्यावर उपचार करण्यास विलंब झाला किंवा कसे, याबाबतचा अहवाल समितीने तयार केला असून, तो केंद्र सरकारच्या कुटुंब कल्याण विभागाला सादर करण्यात आला आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.**



महापालिकेच्या आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली माता मृत्यू अन्वेषण समितीची बैठक झाली. या समितीत महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांच्यासह बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील स्त्रीरोग विभागाचे प्राध्यापक, राज्याच्या आरोग्य विभागाचे अधिकारी आणि भूलतज्ज्ञ यांचा समावेश होता. समितीच्या चौकशीत प्रामुख्याने ईश्वरी यांना त्यांच्या कुटुंबीयांनी वेळेत आणले का, त्यांना रुग्णालयात नेण्यासाठीचा प्रवासाचा काळ जास्त होता का आणि तिच्यावरील उपचारास विलंब झाला का, या तीन प्रमुख कारणांचा शोध घेण्यात आला. समितीची बैठकीत यावर चर्चा करण्यात आली, असे सूत्रांनी सांगितले.या समितीने रुग्णाचे सर्व वैद्यकीय अहवाल तपासले आहेत. याचबरोबर दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, सूर्या हॉस्पिटल आणि मणिपाल रुग्णालयातील डॉक्टरांचे जबाब नोंदविले. तसेच, ईश्वरी यांच्या कुटुंबीयांचेही जबाब नोंदविले, असे सूत्रांनी नमूद केले.

समितीचा अहवाल केंद्र सरकारच्या कुटुंब कल्याण विभागाच्या माता, बालमृत्यू सर्वेक्षण व प्रतिसाद संकेतस्थळावर गुरुवारी (ता. ११) रात्री उशिरा अपलोड करण्यात आला,महापालिकेच्या आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली माता मृत्यू अन्वेषण समितीची बैठक झाली.

### उपचार करण्यास विलंब झाला

सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांच्यासह बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयातील स्त्रीरोग विभागाचे प्राध्यापक, राज्याच्या आरोग्य विभागाचे अधिकारी आणि भूलतज्ज्ञ यांचा समावेश होता. समितीच्या चौकशीत प्रामुख्याने ईश्वरी यांना त्यांच्या कुटुंबीयांनी वेळेत आणले का या तीन प्रमुख कारणांचा शोध घेण्यात आला. समितीची बैठकीत यावर चर्चा करण्यात आली.

## रोजगार मेळाव्यात 136 पाल्यांची निवड

# पोलीस पाल्यांच्या ‘करिअर’साठी आयुक्तांचा पुढाकार!

## पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांचा उपक्रम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पोलीस पाल्यांना नोकरीसाठी मार्गदर्शन मिळावे तसेच नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पुढाकार घेतला आहे. पोलीस पाल्यांसाठी रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या. रहाटणी येथे झालेल्या रोजगार मेळाव्यात उपस्थित २५० पोलीस पाल्यांपैकी १३६ पाल्यांची पहिल्या फेरीत निवड झाली आहे. पोलीस आयुक्तांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री १०० दिवसीय कृती कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.**



कार्यक्रमात पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील विविध कंपन्यामध्ये आवश्यकतेनुसार जास्तीत जास्त पोलीस पाल्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला. तसेच पोलीस पाल्यांना मिळालेल्या संधीचे सोने करावे तसेच आपली मेहनत, अपार कष्ट, शिस्त व जबाबदारीचे पालन करुन आपला व नियुक्त होणा-या कंपनीचा उत्कर्ष व्हावा या ध्येयाने प्रेरित होऊन आपले काम करावे असे मार्गदर्शन पोलीस आयुक्तांनी केले.

कार्यक्रमासाठी अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार, पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त सुनिल कु-हाडे, टाटा मोटार्स, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, बजाज, हुंडाई, लुमॅक्स या प्रतिष्ठित कंपन्यासह एकूण ३७ विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, एच आर व २५० पोलीस पाल्य उपस्थित होते. उपस्थित उमेदवारांपैकी १३६ पाल्यांची निवड करण्यात आली, तसेच मुलाखतीच्या दुस-या व तिस-या व चौथ्या फेरीसाठी ५२ उमेदवारांची निवड होऊ शकते. पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी आभार मानले.

> “पोलीस पाल्यांचे ‘करियर’ निश्चित करून त्यांना योग्य दिशेने पुढे नेणे. त्यांना व्यासपीठ मिळवून देणे हा एक प्रयत्न यामागील आहे. यातून निश्चितच अनेक पोलीसपाल्यांचे करिअर घडणार आहे.
>
> **–विनयकुमार चौबे,** पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड शहर

---

## महात्मा फुलेंचे कार्य अजरामर !

### आमदार महेश लांडगे : ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरु केल्या

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य आणि समाजातील जातिभेद पाहून महात्मा फुले यांनी सामाजिक परिस्थिती सुधारण्याचा निश्चय केला. त्यांनी पुण्यातील भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली मराठी शाळा सुरू केली. त्याची जबाबदारी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर सोपवली. त्यानंतरच्या काळातही ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यांसाठी शाळा सुरू केल्या. भारताच्या इतिहासात महात्मा फुले यांचे कार्य अजरामर राहणार आहे, अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.**




महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे निवासस्थान “महात्मा फुले वाडा” येथे आमदार महेश लांडगे यांनी भेट दिली आणि अभिवादन केले.

“महात्मा फुले वाडा” हा समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांचे निवासस्थान होते. १८५२ च्या सुमारास बांधण्यात आलेल्या या वाड्याला महाराष्ट्र प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्व स्थळे आणि अवशेष अधिनियम १९६० अंतर्गत १९७२ साली राज्य संरक्षित वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच, पुणे महानगरपालिकेतर्फे (पीएमसी) प्रथम श्रेणी ऐतिहासिक वास्तू म्हणूनही प्रमाणित केले गेले आहे. महाराष्ट्र सरकारच्या राज्य पुरातत्त्व विभागाकडून या दगडी वास्तूची देखभाल केली जात आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे, समानता आणि सत्यासाठी देह झिजणारे, बहुजनांचे उध्दारक, सत्यशोधक समाजाचे संस्थापक आणि थोर विचारवंत महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन आम्ही सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहोत.

> “स्त्री शिक्षणाचे जनक, थोर समाज सुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले म्हणजे विचारवंत, जातिविरोधी समाजसुधारक आणि लेखक असे देशाच्या इतिहासातील अष्टपैलू व्यक्तीमत्व आहेत. स्त्री शिक्षणासाठी त्यांनी पुढाकर घेतला. त्यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा पुण्यात सुरू केली. स्त्रियांच्या शिक्षणाच्या आद्यप्रवर्तकांचे हे आता स्मारक आहे. महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासमोर नतमस्तक झालो. यातून समाजासाठी काम करण्याची नवी ऊर्जा मिळाली.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सर्वस्वी राहावे रामास अर्पण।

आता ऐका माझे वचन । मनाने व्हावे रामार्पण ॥ माझे नातेगोते एक राम । हा भाव ठेवून जावे रामास शरण ॥ अनन्य व्हावे भगवंती । जो कृपेची साक्षात् मूर्ति ॥ रामा आता करणे नाही उरले जाण । तुला आलो मी अनन्य शरण ॥

सुखदु:खाचा दाता । सत्य नाही दुजा आता ॥ जाणिवेने जैसे घ्यावे । तैसे मनाने सुखदु:ख भोगावे ॥ मी-माझेपणाची जोपर्यंत धडपड जाण । तोपर्यंत नाही समाधान ॥ सर्वस्वी राहावे रामास अर्पण । हाच उपाय सांगती साधुजन ॥

रामाला अर्पण व्हावे कोण्या रीती । त्याचा मार्ग सज्जन सांगती ॥ प्रयत्नेविण राहो नये । फळाची आशा ठेवू नये । भगवंताला विसरू नये । कर्तव्य या दृष्टीने कर्म करावे ॥ प्रथम राखावे भगवंताचे अधिष्ठान । तेथे व्हावा प्रयत्नाचा उगम ॥

अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण॥ वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेच संताचे मुख्य लक्षण जाण ॥ जे जे घडेल काही । ते ते रामइच्छेने पाही॥ असा करावा संसार ।

परि असावे खबरदार । त्राता राम जाणुनी चित्ती । निर्भय करावी आपली वृत्ति। थोर भाग्य उदया आले । रामराय घरी आले । आता व्हावे रामाचे आपण। व्यवहार प्रपंच करावा जतन ॥ न दुज्याचा दोष पाहावा । त्याचा आपणापाशीच ठेवा ॥

देह आहे परतंत्र । मन राखावे भगवंताशी स्वतंत्र ॥ मनाने जो बांधला । परतंत्र वाटेल त्याला ॥ शरण गेला रामचरणी । त्याला नाही दुजी हानि ॥ अखंड करावे नामस्मरण । नीतिधर्माचे असावे आचरण ॥ बायकोमुले, लहान थोर । यांनी न सोडावा रघुवीर॥

काळ फार कठीण आला । बुद्धिभेद त्वरित झाला ॥ आता सांभाळावे सर्वांनी आपण । रामाविण न जाऊ द्यावा क्षण । चालले तसेच चालावे। राम ठेवील तसे असावे ॥ माझा राम जोडला हे जाणले ज्याने । त्याला न उरले करणे॥ राम ठेवील ज्या स्थितीत । त्यात समाधान मानावे॥ रामास जे करणे असेल। ते तो करील ॥ सदा सर्वकाळ माझ्याशी वास। हाच धरावा हव्यास॥ त्याला न जावे लागे कोठे। घरबसल्या राम भेटे॥ जो करी रामपदांबुजचिंतन । तयास नाही यमाचे बंधन॥ संताची सेवा केली । महद्भाग्य घरी आले॥ एका परमात्म्याशिवाय नाही कोणास शरण ॥ तोच खरा धन्य धन्य ॥ संताचे मर्जीने वागल्यास। कल्याण होईल खास॥

बोधवचन:- अखंड राखावे अनुसंधान। येणे कर्म होईल सहज रामार्पण॥

# काँग्रेसचा अधिवेशन फार्स म्हणजे, बोलाची कढी, बोलाचाच भात !



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**गुजरातमधील अहमदाबाद येथे तब्बल ८४ वर्षांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन झाले. साहजिकच लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने ९९ जागा जिंकल्यामुळे काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे आणि त्यांच्या नेतेमंडळींमध्ये नक्कीच जोश आला आहे, हे त्यावेळी दिसून आले.**



### गुजरातमध्ये काँग्रेस सतत अपयशी !

त्या आधीच्या म्हणजे २०१४ आणि २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीत लोकसभेत काँग्रेसकडे विरोधी पक्ष नेता निवडता येईल, एवढे सुद्धा संख्याबळ नव्हते. दहा वर्षांनंतर ते ९९ करण्यातपर्यंत काँग्रेसची मजल गेली. खरोखरच ही चमकदार कामगिरी म्हणावी लागेल. आता गुजरातमध्ये काँग्रेसला मुसंडी मारायची आहे. खरे तर हे काम अवघड नव्हे, अशक्यच आहे. गुजरातमध्ये गेल्या तीन दशकांपासून काँग्रेसला विजय मिळवता आला नाही. काँग्रेसने अनेक प्रयत्न केले, मात्र राज्यात भाजपा चा पराभव करणे, त्यांना जमलेले नाही.

### हे तर नरेंद्र मोदींचे 'होम पीच'..

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गुजरात हे 'होम पीच' असल्यामुळे या ठिकाणीच धमाका करावा, असा विचार काँग्रेसचा असू शकतो.या सर्व पार्श्वभूमीवर २०२७ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला प्रबळ विरोधक म्हणून सभागृहात भूमिका बजावायची असेल, तर कष्ट घेणे आवश्यक आहे आणि काँग्रेसने त्यासाठी मिशन २०२७ अंतर्गत त्याची तयारी सुरू केली आहे. परंतु मोदी आणि अमित शाह यांच्या या राज्यात त्यांना कितपत यश मिळणार ही एक शंकाच आहे.

### भाजपाने पटेल यांना हायजॅक केले !

यापूर्वी १९६१ मध्ये गुजरातच्या भावनगर येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले होते. त्याचबरोबर सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंती वर्ष असल्याने काँग्रेसने हा मुहूर्त सुद्धा विचारात घेतला आहे. विशेषत:, काँग्रेस आणि संघाचे त्यांच्याबरोबर असलेले संबंध , त्याचबरोबर नेहरू आणि वल्लभभाई पटेल यांच्यामधील असणारे रागलोभ, यावर प्रकाश टाकून काँग्रेसच्या दृष्टीने योग्य असणारी वस्तुस्थिती त्यांना देशभर रुजवायची आहे. गेल्या ११ वर्षात भारतीय जनता पक्षाने पोलादीपुरुष वल्लभभाई पटेल यांना काँग्रेसपासून बऱ्यापैकी दूर केले आहे.. 'हायजॅक' केले आहे. त्यांच्या पुतळ्यापासून ते वल्लभभाई पटेल आणि संघाशी असणारे त्यांचे नाते, त्याचबरोबर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याबरोबर त्यांचा असलेला कथित दुरावा याचा लेखाजोखा गेल्या दहा वर्षात भारतीय जनता पक्षाने केवळ मांडला नाही, तर तो ताकदीने अधोरेखित केला आहे.

### खर्गे यांनी तोंड फोडले !

त्यामुळेच, अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मल्लिकार्जुन खर्गे यांना पक्षाचे अध्यक्ष म्हणून या विषयाला तोंड फोडावे लागले. एका अर्थाने नेहरू-पटेल यांच्या विचारधारा आणि त्यांच्या विचारांवर पहिला हक्क काँग्रेसचाच आहे. खरे म्हणजे, ते काँग्रेसचे संचित आहे. हे त्यांना कळवळून सांगावे लागले. यातच भारतीय जनता पक्षाने या दोघांबाबत किती परिणामकारक प्रचार केला आहे, हे लक्षात येते. साहजिकच अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार हल्ला चढवला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची धोरणे आणि त्या धोरणांची अंमलबजावणी करणारा भारतीय जनता पक्ष हे राष्ट्राचे कल्याण करत नाहीत, जातीय तणाव निर्माण करत आहेत. विशेषत: मुस्लिम आणि अल्पसंख्यांक तसेच संविधान यावर हल्ला चढवत आहेत. संविधान बदलण्याचा किंवा ते बाजूला ठेवून मनमानी करण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचे राहुल गांधी यांनी मोठ्या त्वेषाने सांगितले. त्याचा परिणाम किती होणार हे काळच ठरवेल!

### काँग्रेसची त्रिसूत्री

अध्यक्षीय भाषणात राहुल गांधी यांच्या या विचारांवर मल्लिकार्जुन खर्गे यांनी सहा महत्त्वाचे मुद्दे मांडले. यामध्ये विचार ,आचार आणि प्रचार हे मूलभूत मुद्दे काँग्रेसजनांनी विचारात घ्यायला पाहिजेत, त्यावर काम केले पाहिजे असे स्पष्ट केले. काँग्रेसकडे विचार आहेत. त्यांची भूमिका आणि दृष्टिकोन पक्का आहे. त्याप्रमाणे काम करणे, आचरण करणे गरजेचे आहे आणि जे केले आहे, यापूर्वी झाले आहे,त्याचा प्रचार मोठ्या प्रमाणात केला पाहिजे. हे त्यांनी पोटतिडकीने सांगितले. हे सांगत असतानाच या मूलभूत विचारांना पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ मानसिक बळ आणि आर्थिक बळ गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आता या सगळ्या भाषणामध्ये काँग्रेसकडे जी विचारधारा आहे, त्या विचारधारेला अनुसरून काम करणारी किती मंडळी आहेत आणि जी मंडळी काम करत आहेत, त्यांना काँग्रेस खरोखर सन्मानाची वागणूक देते का? हा कळीचा मुद्दा आहे.

### सगळीकडे सत्तातूर जंतू..

गेल्या दहा ते पंधरा वर्षात सत्तातूर जंतू सर्वच पक्षात वेगाने वाढल्यामुळे कोणताच पक्ष सत्तेशिवाय राहू शकत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या दहा वर्षात आयाराम - गयारामांचे प्रमाण पाहिले, तर स्वातंत्र्य स्थापनेपासून २०१४ पर्यंत एवढ्या मंडळींनी महाराष्ट्रात पक्षांतर केले, त्यापेक्षा या दहा वर्षात अधिक कार्यकर्ते आणि नेत्यांनी आपले पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात उड्या घेतल्याचे पाहायला मिळते. थोडक्यात, सत्तेशिवाय राहता येत नाही, ही धारणा राजकारण करणाऱ्यांची झाली आहे.

### राहुल गांधी हे विश्वासार्ह नेतृत्व नाही !

आता उपदेश आणि मौलिक विचारांचे बोल फारसे कोणाला पटतील, असे वाटत नाही. आई, मुलगा आणि मुलगी असे कुटुंब जेव्हा संसदेत विराजमान होते आणि जावयाला सुद्धा संसदेत येण्याची स्वप्ने पडू लागतात, अशावेळी सर्वसामान्य प्रामाणिक तत्त्वनिष्ठ कार्यकर्त्याला उपदेशाचे डोस पाजले, तर ते किती पचतील, याचा विचार नक्कीच केला पाहिजे. काँग्रेसकडे राहुल गांधी हे विश्वासार्ह नेतृत्व नाही. लहरीनुसार ते राजकारण करतात आणि त्यामुळे विरोधी पक्ष नेता म्हणून जी जरब सत्ताधाऱ्यांवर असली पाहिजे, ती त्यांच्याकडून निर्माण झालेली नाही. अशा परिस्थितीत काँग्रेस अधिवेशन हा एक उपचार होऊ शकतो.

### अधिवेशनाची नेमकी कमाई काय ?

या सर्व पार्श्वभूमीवर भारतातील कार्यकर्त्यांना या अधिवेशनात काय मिळाले, हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. अनेक महत्त्वाचे प्रश्न समोर असताना भाजप आणि संघाला दोषारोप देण्यात वेळ वाया घालवणे काँग्रेसला परवडणारे नाही. भाजपच्या दृष्टीने विरोधक म्हणून काँग्रेस हा पहिला आवडीचा पक्ष आहे. देशात काँग्रेस व्यतिरिक्त राष्ट्रीय पक्ष म्हणून विरोधक असणारा दुसरा पक्ष अस्तित्वात नाही.

### विरोधक म्हणून काँग्रेसला सांभाळतील !

साहजिकच, भारतीय जनता पक्ष काँग्रेसला विरोधक म्हणून नक्कीच सांभाळेल. काँग्रेसच्या अशा अधिवेशनाने देशातील जनता फार उत्साहित होऊन काँग्रेसच्या सरदार पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू किंवा महात्मा गांधी यांच्या विचारधारेमागे तातडीने चालू लागेल, अशी आजची परिस्थिती नक्कीच नाही. किंबहुना, सांगणारे त्या तोलामोलाचे नाहीत आणि ऐकणाऱ्यांनी आपली बुद्धी गहाण टाकलेली नाही, अशी सध्याची अवस्था आहे.

गुजरात आणि बिहारच्या निवडणुका जिंकण्यासाठी आणि त्या चांगल्या पद्धतीने लढवण्यासाठी काँग्रेसला बरेच प्रयत्न करावे लागतील, हे त्यांच्या निवडणूक पार्श्वभूमीवरच्या या पहिल्या अधिवेशनातून स्पष्ट झाले, आणि ते सर्वांच्या लक्षात आलेले आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुलींची पहिली थोरल्या प्रतापसिंहांनी सुरु केली!

## खासदार उदयनराजे भोसलेंच्या वक्तव्यामुळे नवीन वाद



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महात्मा जोतीराव फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी खासदार उदयनराजे भोसले यांनी आज पुण्यातील फुले वाड्याला भेट दिली. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधत असताना विविध विषयांवर भाष्य केले. छत्रपती शिवाजी महाराजांचा समतेचा, सर्व धर्म समभावाचा विचार जोतीराव फुलेंनी जनसामान्यांत पोहोचवण्याचे काम फुलेंनी केले असल्याचे उदयनराजे भोसले यांनी सांगितले. फुलेंच्या कार्याचा गौरव करत असताना त्यांनी मुलींची शाळा काढण्याची प्रेरणा कुणाकडून घेतली याबद्दलही त्यांनी वाच्यता केली.**

महात्मा फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत असताना उदयनराजे भोसले म्हणाले की, महात्मा फुले चांगले उद्योजक, अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. त्यांनी आयुष्यभर कष्ट करून जी संपत्ती गोळा केली, ती सर्व समाज सुधारण्याच्या कामाकरिता खर्च केली. महात्मा फुले यांनी एकप्रकारे थोरले प्रतापसिंह महाराजांचे अनुकरण केले होते. सर्वात आधी स्त्री शिक्षणासाठी शाळा कुणी सुरू केली असेल तर ती थोरल्या प्रतापसिंहांनी सातारच्या राजवाड्यात केली होती. उदयनराजे भोसले पुढे म्हणाले, ज्या राजवाड्यात शाळा सुरू करण्यात आली होती. त्याच ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षण झाले होते. समाजासाठी झटलेल्या महापुरूषांच्या स्मारकाचे जतन करणे आपल्या सर्वांचे काम आहे. भावी पिढीला यातून प्रेरणा मिळावी. महापुरूषांच्या विचारांचे भावी पिढीने अनुकरण करावे, याकरिता महापुरूषांच्या जयंती, पुण्यतिथी साजरी करायला हवी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या पुण्यतिथी निमित्त (१२ एप्रिल) रायगड किल्ल्यावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असेही उदयनराजे भोसले यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण लोकांकरिता खर्च केला. राज्यकारभारात लोकांचा सहभाग असावा, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. पण आज दुःख याचे वाटते की, ज्या महापुरूषांनी निस्वार्थीपणे आयुष्य वेचले त्यांच्याबद्दल अनुद्गार काढले जात आहेत. अशा लोकांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी कायदा करण्यात यावा, अशी मागणी मी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असल्याचेही उदयनराजे भोसले यांनी सांगितले.काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत उदयनराजेंच्या विधानाचा समाचार घेतला. ते म्हणाले, महात्मा फुलेंचे अनन्यसाधारण योगदान आपल्या सर्वांना माहीत आहेच. पण इतिहासाची विनाकारण खोडसाळपणे छेडछाड करण्यात येत आहे. उद्या उठून कुणी म्हणेल की, पुराणातील गार्गी नावाची महिला आधीच शिक्षिका झाली होती. दरम्यान उदयनराजे भोसले यांच्या या दाव्यावर अनेकांनी टीका केली. ओबीसी नेते लक्ष्मण हाके म्हणाले की, कुठलाही अभ्यास न करता किंवा इतिहास तज्ज्ञाचा सल्ला न घेता लोकसभेच्या खासदाराने अशी बेजबाबदार विधाने करू नयेत, असे आमचे मत आहे. महात्मा जोतीराव फुलेंची आज जयंती असताना खासदार इतके बेजबाबदार कसे काय वागू शकतात? याबद्दल मी त्यांचा निषेध करतो. आणखी एक ओबीसी नेते मंगेश ससाणे यांनीही उदयनराजे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, आज फुलेंची जयंती असताना उदयनराजेंनी इथे येऊन त्यांचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. आज इथे येऊन त्यांनी स्वतःच्या पूर्वजांचे महत्त्व सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांना संपूर्ण महाराष्ट्र मानतो.

### छगन भुजबळ काय म्हणाले?

छत्रपती शिवाजी महाराजांवरील पहिला पोवाडा हा फुलेंनीच लिहिला होता. मात्र उदयनराजे नवा ऐतिहासिक शोध लावून महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासाला धक्का देण्याचा प्रयत्न करत आहेत."मी जे काही वाचलं त्यामध्ये महात्मा फुले यांनी थॉमस पेन आणि इतर जे जगातील तत्त्वज्ञ आहेत त्यांची पुस्तक वाचून त्यांनी स्त्री शिक्षणाची प्रेरणा घेतली. हा एक मुद्दा. आता खासदार उदयनराजे भोसले या संदर्भात बोलले. पण आता उदयनराजे ओ राजा है हम प्रजा है, हम उनके खिलाफ कैसे बात करेंगे?"छगन भुजबळ पुढे म्हणाले की, "पूर्वीचे राजे, राजवाडे आपल्या घरातील मुलांना शिकवण्यासाठी राजवाड्यामध्येच शिक्षणाची व्यवस्था करत होते.

# पालकमंत्रिपदावरून वादाची ठिणगी?

## तर मोठा उठाव होईल', शिंदेंच्या आमदाराचा तटकरेंना इशारा



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गेल्या काही दिवसांपासून महायुती सरकारमध्ये रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा तिढा सुटलेला नाही. रायगड आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदासाठी शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते आग्रही आहेत. मात्र, जेव्हा पालकमंत्री पदाची यादी जाहीर करण्यात आली होती, तेव्हा रायगडचं पालकमंत्री पद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या अदिती तटकरे यांना तर नाशिकचं पालकमंत्री पद भाजपाचे नेते गिरीश महाजन यांच्याकडे देण्यात आलं होतं.**

मात्र, यानंतर शिवसेनेच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर या दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली होती. तेव्हापासून अद्याप हा पालकमंत्री पदाचा तिढा सुटलेला नाही. आता देशाचे गृहमंत्री अमित शाह हे रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यामुळे अमित शाह यांच्या या दौऱ्यात पालकमंत्री पदाचा तिढा सुटेल अशा चर्चा राजकीय वर्तुळात आहेत. मात्र, असं असतानाच शिवसेना (शिंदे) पक्षाचे आमदार महेंद्र दळवी यांनी मोठा इशारा दिला आहे. आम्हाला न्याय मिळाला नाही तर उठाव करण्याचा इशारा आमदार महेंद्र दळवी यांनी दिला आहे. ते एबीपी माझा या वृत्तवाहीनीशी बोलत होते.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे उद्या रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

त्यामुळे या दौऱ्यात पालकमंत्री पदाचा तिढा सुटेल का? असा प्रश्न आमदार महेंद्र दळवी यांना विचारण्यात आला होता. यावर बोलताना आमदार दळवी यांनी म्हटलं की, "आम्हाला नक्कीच न्याय मिळेल. अमित शाह हे रायगडच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा नियोजित कार्यक्रम आहे. तसेच अमित शाह हे खासदार तटकरे यांच्याकडे भोजनाच्या कार्यक्रमासाठी जाणार आहेत. मात्र, बंद दाराआड चर्चा करण्याची काही गरज आहे असं मला वाटत नाही. कारण आम्ही सर्वच रायगडवासीय आशावादी आहोत की भरत गोगावले यांच्या रुपाने आम्हाला पालकमंत्री मिळेल", असं आमदार महेंद्र दळवी यांनी म्हटलं आहे.खरं तर खूप उशीर झाला आहे. पण मला वाटतं की मागच्या परिवर्तनात रायगडचा इतिहास हा सर्वांना ज्ञात आहे. तेव्हा भरत गोगावले हे कदाचित मंत्री झाले असते तर ते पालकमंत्री नक्कीच झाले असते. कारण भरत गोगावले हे चार टर्मचे आमदार आहेत, आता मंत्री आहेत. प्रोटोकॉलनुसार गोगावले यांना पालकमंत्री पद द्यायला पाहिजे.

### आम्हाला नक्कीच न्याय मिळेल

मात्र, सुनील तटकरे यांचा नेहमीप्रमाणे हव्यास असतो. सुनील तटकरे यांचा हव्यास असला तरी रायगडची जनता हे स्वीकारणार नाही", असं म्हणत आमदार महेंद्र दळवी यांनी खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका केली. "आम्ही सर्वजण आशावादी आहोत की आम्हाला नक्कीच न्याय मिळेल

# आयातशुल्क निर्णयानंतर चीन अडचणीत?

## अमित शाह यांनी सांगितला टोपणनावामागचा किस्सा

।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ (आयातशुल्क) धोरणावरून सध्या आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठ्या घडामोडी घडत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी जगातील ७० देशांवर आयातशुल्क लादण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, त्यानंतर जगभरात मोठा गदारोळ निर्माण झाला. यानंतर अखेर डोनाल्ड ट्रम्प यांनी काहीशी माघार घेत बहुसंख्य देशांवरील आयातशुल्काला ९० दिवसांची स्थगिती दिली. मात्र, यामधून चीनला वगळण्यात आलं. त्यामुळे चीनला मोठा धक्का बसला.**



ट्रम्प प्रशासनाने चीनवर आधी ३४ टक्के आयातशुल्क लादण्याचा निर्णय घेतला होता. पण अमेरिकेच्या या निर्णयाला चीनने जशास तसं प्रत्युत्तर दिलं. त्यानंतर अमेरिकेने पुन्हा चीनवर १०४ टक्के आयात कर लादण्याची घोषणा केली. यानंतर चीननेही अमेरिकेवर ८४ टक्के वाढीव आयात कर लादण्याची घोषणा केली. यानंतर अमेरिकेने चीनवरील आयातशुल्क थेट १४५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं स्पष्ट केलं. यानंतर चीनने पुन्हा एकदा अमेरिकेला जोरदार प्रत्युत्तर देत चीनने अमेरिकन वस्तूंवरील आयातशुल्क १२५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली. दरम्यान, अमेरिका आणि चीन यांच्यातील या 'टॅरिफ वॉर'चा फटका जगभरातील देशांना बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.अमेरिकेने १४५ टक्के आयातशुल्क लादल्याच्या घोषणेनंतर चीनच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता चीनने भारतानंतर युरोपियन महासंघाला एकत्रितपणे या विरोधात लढण्याचं आवाहन केलं आहे.

दरम्यान, अमेरिकेने युरोपियन महासंघालाही आयातशुल्क लादलं होतं. मात्र, युरोपियन महासंघाने प्रत्युत्तर दिल्यानंतर ट्रम्प प्रशासनाने हा निर्णय ९० दिवसांसाठी स्थगित केला, याचा उल्लेख करत चीनने युरोपियन महासंघाला हे आवाहन केलं. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

मात्र, जर अमेरिका बेपर्वा वागत असेल तर चीन हे व्यापार युद्ध लढण्यास तयार असल्याचंही चीनने म्हटलं आहे.अमेरिकेच्या या व्यापार कर युद्धाच्या विरोधात लढण्यासाठी आणि ट्रम्प प्रशासनाने लादलेल्या आयात शुल्कामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारत व चीनने एकत्र आलं पाहिजे, असं चीनने म्हटलं होतं. यानंतर आता चीनने युरोपियन महासंघालाही एकत्रितपणे लढण्याचं आवाहन केलं आहे. अमेरिकेबरोबरच्या व्यापार युद्धातून बाहेर पडण्यासाठी युरोपियन महासंघ आणि चीनने एकमेकांना सहकार्य करण्याची आवश्यकता असल्याचं शी जिनपिंग यांनी म्हटलं आहे.स्पेनचे पंतप्रधान अध्यक्ष पेड्रो सांचेझ यांच्याशी बीजिंगमध्ये झालेल्या भेटीदरम्यान चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी युरोपियन महासंघाला चीनसोबत एकत्र काम करण्याचं आवाहन केलं. जेणेकरून ते अमेरिकेबरोबरच्या वाढत्या व्यापार वादाचा सामना करू शकतील. शी जिनपिंग यांनी म्हटलं की, "चीन आणि युरोपने संयुक्तपणे त्यांच्या आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत आणि अमेरिकेच्या एकतर्फी धमकी देणाऱ्या धोरणांना संयुक्तपणे विरोध केला पाहिजे. तसेच यामुळे दोन्ही पक्षांचे हक्क आणि हितसंबंध जपले जातीलच. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर न्याय आणि समानता देखील बळकट होईल.ट्रम्प प्रशासनाने चीनवर आधी ३४ टक्के आयातशुल्क लादण्याचा निर्णय घेतला होता. पण अमेरिकेच्या या निर्णयाला चीनने जशास तसं प्रत्युत्तर दिलं.

### अमेरिकेवर 84 टक्के वाढीव कर

त्यानंतर अमेरिकेने पुन्हा चीनवर १०४ टक्के आयात कर लादण्याची घोषणा केली. यानंतर चीननेही अमेरिकेवर ८४ टक्के वाढीव आयात कर लादण्याची घोषणा केली. यानंतर अमेरिकेने चीनवरील आयातशुल्क थेट १४५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचं स्पष्ट केलं. यानंतर चीनने पुन्हा एकदा अमेरिकेला जोरदार प्रत्युत्तर देत चीनने अमेरिकन वस्तूंवरील आयातशुल्क १२५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली. दरम्यान, अमेरिका आणि चीन यांच्यातील या 'टॅरिफ वॉर'चा फटका जगभरातील देशांना बसण्याची शक्यता नाकारता येत नाही.अमेरिकेने १४५ टक्के आयातशुल्क लादल्याच्या घोषणेनंतर चीनच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

# उत्तर प्रदेशात अवकाळी पावसाचा कहर

## उत्तर प्रदेशात पावसाशी संबंधित घटनांमध्ये 22 जणांचा मृत्यू

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बिहार आणि उत्तर प्रदेशात अवकाळी पावसाचा कहर सुरु आहे. एकीकडे तीव्र उष्णता तर दुसरीकडे अवकाळी पावसाचा कहर असं चित्र देशातील विविध भागात पाहायला मिळत आहे. आता उत्तर प्रदेशातील काही जिल्ह्यात आणि बिहारमधील काही जिल्ह्यात जोरदार अवकाळी पावसाचा फटका बसला आहे.**



अनेक ठिकाणी वीज कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत. बिहार आणि उत्तर प्रदेशात वीज कोसळून आणि वादळ वाऱ्यामुळे घडलेल्या घटनांमध्ये ४७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच बिहारमध्ये वादळामुळे घडलेल्या वेगवेगळ्या घटनेत २५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती सांगण्यात येत आहे. बिहारमधील अनेक जिल्ह्यांत गारपीट झाली, तसेच अनेक ठिकाणी वीज कोसळल्याची घटना घडली. अनेक ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचं नुकसान झालं. तसेच उत्तर प्रदेशातील १५ जिल्ह्यांमध्ये गारपीट झाल्यामुळे तेथेही शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. या संदर्भातील वृत्त पीटीआयच्या हवाल्याने हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.दरम्यान, याबाबत बिहारच्या मुख्यमंत्री कार्यालयाने (सीएमओ) एक निवेदन जारी केलं आहे. या निवेदनानुसार, नालंदा येथे १८ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच सिवानमध्ये दोघे, कटिहार, दरभंगा, बेगुसराय, भागलपूर आणि जहानाबादमध्ये प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. बिहारमधील राजद नेते तेजस्वी यादव यांनी एक्सवर (ट्वीटर) एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये बिहारमधील पावसाच्या घटनेशी संबंधित दावा केला आहे की राज्यात पावसाशी संबंधित घटनांमध्ये ५० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. तेजस्वी यादव यांनी म्हटलं की, "बिहारमध्ये वादळ, पाऊस, वीज पडणे, झाड आणि भिंत कोसळणे या विविध घटनांमध्ये ५० हून अधिक लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने मला खूप दुःख झालं आहे. मी माझ्या मनातील संवेदना व्यक्त करतो. या दुःखात देव आपत्तीमुळे बाधित झालेल्या कुटुंबांना शक्ती देवो", असं तेजस्वी यादव यांनी म्हटलं आहे किशनगंज, अररिया, सुपौल, गया, सीतामढी, शेओहर, नालंदा, नवाडा आणि पाटणा या जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

### 50 हून अधिक लोकांचा मृत्यू

फतेहपूर आणि आझमगड जिल्ह्यात प्रत्येकी तीन, फिरोजाबाद, कानपूर देहात आणि सीतापूर जिल्ह्यात प्रत्येकी दोन, गाजीपूर, गोंडा, अमेठी, संत कबीर नगर आणि सिद्धार्थनगर जिल्ह्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला आहे. बलिया, कन्नौज, बाराबंकी, जौनपूर आणि उन्नाव जिल्ह्यात प्रत्येकी एकाचा मृत्यू वीज पडून झाला आहे.

# माझा नवरा..माझ्यासाठी खरा हिरो आहे



भूषण प्रधान हा सध्या मराठी सिनेविश्वातील आघाडीचा अभिनेता आहे. भूषणने आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. गेल्या वर्षी भूषणचे दोन चित्रपट 'जुनं फर्निचर' आणि 'घरत गणपती' हे चांगलेच गाजले. चित्रपटांमध्ये तो प्रमुख भूमिकेत झळकला होता. या चित्रपटातील त्याच्या कामाचं भरभरून कौतुक करण्यात आलं होतं. नुकताच २०२५मधील त्याचा पहिला चित्रपट प्रदर्शित झाला. 'गाव बोलावतो' असं भूषणच्या नव्या चित्रपटाचं नाव असून २१ मार्चपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला आहे. त्यामुळे सध्या भूषण चर्चेत आहे. 'गाव बोलावतो' या चित्रपटात भूषण प्रधानसह गौरी नलावडे, माधव अभ्यंकर, श्रीकांत यादव असे अनेक कलाकार मंडळी महत्त्वाच्या भूमिकेत झळकले आहेत. या चित्रपटानिमित्ताने भूषण सध्या वेगवेगळ्या एंटरटेनमेंट वृत्तसंस्थेशी संवाद साधताना दिसत आहे. याचवेळी भूषणने एक किस्सा सांगितला, जो सध्या चर्चेत आला आहे.'कलाकृती मीडिया'शी संवाद साधताना भूषण प्रधानला विचारलं की, तू कधी सिग्नल तोडला आहेस का? आणि तुला पकडलं का? तेव्हा भूषण किस्सा सांगत म्हणाला, "हो. आजकाल मी कमी सिग्नल तोडतो. अगदी होतं नाही असं नाही. मला नियम पाळायला खूप आवडतात. पण एकदा मी आधी जिथे राहायचो तिथे सिग्नल तोडला होता. त्याच्या काही दिवस आधी तिथेच तेजश्री प्रधानने सिग्नल तोडला होता. मी जेव्हा पकडलो गेलो तेव्हा पोलिसांनी माझ्या आयडीवर नाव पाहिलं आणि म्हणाले, भूषण प्रधान...अभिनेते...हे वाचताच त्यांनी, तेजश्री प्रधान तुमची बहीण आहे का? तिने पण सिग्नल तोडला होता. तुम्ही दोघे भाऊ-बहीण असेच आहात का? मी म्हटलं, आम्ही अजिबात भाऊ बहीण नाही आहोत. त्यानंतर मी तेजश्री प्रधानला फोन केला आणि म्हटलं, तू सिग्नल तोडला होता का? कारण मला सुद्धा तुला पकडलेल्याच पोलिसाने पकडलं होतं. मी सुद्धा सिग्नल तोडला."पुढे भूषण प्रधान म्हणाला की, सिग्नल तोडल्यानंतर दंड भरायला मला काहीही वाटतं नाही. कारण ती चूक आहे. त्यामुळे दंड भरला पाहिजे. बऱ्याच वेळेला मला जाऊन दिलेलं आहे. कारण कलाकारांचं विशेष कौतुक केलं जातं. आतापर्यंत एकदाही सिग्नल न तोडलेला व्यक्ती कोण असेल, असं मला वाटतं नाही. दरम्यान, भूषण प्रधानच्या कामाबद्दल बोलायचं झालं, तर त्याचा 'स्वप्नसुंदरी' नावाचा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचा मुहूर्त सोहळा पार पडला आणि चित्रीकरणाला सुरुवात झाली. अक्षय शिंदे दिग्दर्शित 'स्वप्नसुंदरी' या चित्रपटात भूषणसह सायली पाटील पाहायला मिळणार आहे.

## अभिनेत्रीने डेटिंगच्या चर्चांवर अखेर मौन

'बिग बॉस 13' फेम माहिरा शर्मांचे फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. माहिरी ही पापाराझींच्या आवडत्या स्टार्सपैकी एक आहे. अनेकदा पापाराझी तिचे व्हिडीओ शेअर करत असतात. पारस छाबराबरोबर माहिराचं ब्रेकअप झाल्यानंतर तिचं नाव भारतीय क्रिकेटर मोहम्मद सिराजसोबत जोडलं जात आहे. दोघेही एकमेकांना पसंत करतात आणि एकमेकांना डेट करत आहेत, अशा चर्चा होत्या. या चर्चा मागील अनेक महिन्यांपासून सुरू आहेत. दोघांनाही या नात्याबद्दल विचारलं जात होतं. अखेर माहिरा शर्माने खरं काय ते सांगितलं आहे. तसेच सिराजनेही आयपीएल सुरू होण्यापूर्वी माहिराबरोबरच्या डेटिंगच्या चर्चांवर मौन सोडलं आहे. प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री माहिरा शर्मा क्रिकेटर मोहम्मद सिराजला डेट करत असल्याच्या बातम्या बऱ्याच दिवसांपासून येत आहेत. दोघेही नात्यात असून त्यांना नातं गुपित ठेवायचं आहे, असं बोललं जात होतं.

## एआयमुळे आयुष्यात मोठे बदल



एआयमुळे माणसाच्या आयुष्यात मोठे बदल होताना दिसत आहे. जगभरातील माहिती एका क्लिकवर देण्यापासून ते अवघड आकडेमोडी काही क्षणांत करण्यापर्यंत एआय मदत करते. याबरोबरच चॅट जीपीटी, मेटा एआय माणूस सांगेल त्याप्रमाणे माहिती, छायाचित्रे, नोट्स देत असल्याचे पाहायला मिळते. काही दिवसांपूर्वी घिबली आर्टने धुमाकूळ घातला होता. घिबली आर्टची लोकांना भुरळ पडल्याचे सोशल मीडियावर पाहायला मिळाले. या सगळ्यात एआयच्या चांगल्या वापराबरोबरच त्याचा वाईट पद्धतीनेदेखील वापर केला जातो. आता या एआयचा वापर करत करीना कपूर)चा फोटो बनवला आहे आणि ती डान्स करीत असल्याचे व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये दिसत आहे. पाकिस्तानमधील एका रेव्ह पार्टीमधील एक ॲनिमेटेड व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असल्याचे दिसत आहे. हा ॲनिमेटेड व्हिडीओ करीना कपूर खानचा आहे. यामध्ये ती डान्स करताना दिसत आहे. यामध्ये करीनाने फॉर्मल ड्रेस घातला असून तिने घट्ट वेणी घातल्याचे दिसत आहे. तसेच तिचे विचित्र हावभाव दिसत आहेत. याबरोबरच, या व्हिडीओमध्ये मोठ्याने गाणी लावल्याचे पाहायला मिळत आहे.

## सोनाली बेंद्रेने सर्वांसमोर काढले विग

जगभरातील अनेक जण कर्करोगाचा सामना करतात. या आजाराबाबत सध्या खुलेपणाने बोलले जात आहे. अनेक जण त्यांचा स्वत:चा प्रवास इतरांशी शेअर करताना दिसतात. त्यामुळे जे कर्करोगाचा सामना करत आहेत, त्यांना प्रेरणा मिळते. मनोरंजनविश्वातील अनेक कलाकारदेखील यावर व्यक्त होताना दिसतात. काही दिवसांपूर्वीच आयुषमान खुरानाच्या पत्नीला दुसऱ्यांदा स्तनाचा कर्करोग झाल्याची माहिती समोर आली होती. याआधी हिना खाननेदेखील वेळोवेळी तिच्या कर्करोगाबाबत माहिती चाहत्यांशी शेअर केली आहे. ती ज्या पद्धतीने या सगळ्याला सामोरी जात आहे, ते पाहून चाहते तिचे कौतुक करताना दिसतात. केमोथेरपीदरम्यान रुग्णांना केसगळतीचा सामना करावा लागतो. बॉलीवूड अभिनेत्री सोनाली बेंद्रे(SONALI BENDRE) देखील यामधून गेली आहे.

## नुसरत आपल्या मायदेशी सुखरूप परतली



२०२३ मध्ये ऑक्टोबर महिन्यात झालेल्या इस्राइल आणि पॅलेस्टाईनमधील युद्धात बॉलिवूड अभिनेत्री नुसरत भरुचा अडकली होती. अभिनेत्री 'हायफा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल'मध्ये सहभागी होण्यासाठी तिथे गेली होती. या चित्रपट महोत्सवात नुसरतचा 'अकेली' हा चित्रपट दाखवण्यात आला होता. पण त्याच दरम्यान तिथे युद्ध झाले आणि नुसरत तिथेच अडकली होती. यादरम्यान अभिनेत्रीचा संपर्कही तुटला होता. या युद्धातून नुसरत सुखरूप आपल्या मायदेशी परत यावी म्हणून तिचे अनेक चाहते व कुटुंबीय प्रार्थना करत होते. त्यानंतर भारत सरकारने अनेक प्रयत्न करत नुसरतला मायदेशी सुखरूप आणलं. तेव्हा अडचणीत सापडलेल्या नुसरतने भारत सरकारकडे मदत मागितली होती. यावर भारत सरकारनेही इस्रायल सरकारबरोबर मिळून नुसरतची सुटका केली आणि तिला भारतात आणण्यात आले होते.याचबद्दल नुसरतने भारत सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानले आहेत. 'न्यूज १८'च्या रायझिंग इंडिया समिट कार्यक्रमात नुसरत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात भेट झाली. या भेटीचे फोटो आणि व्हिडीओ शेअर करत नुसरतने त्यांचे आभार मानले आहेत. या पोस्टमध्ये अभिनेत्रीने असं म्हटलं आहे की, च्या रायझिंग भारत समिटमध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आयुष्यात पहिल्यांदाच भेटण्याची संधी मिळाल्याबद्दल मी मनापासून आभारी आहे."यापुढे तिने असं म्हटलं की, "मोदीजी, तुमच्या अटल नेतृत्वाबद्दल आणि अलीकडच्या संघर्षादरम्यान इस्रायलमध्ये अडकलेल्या माझ्यासह भारतीय नागरिकांना परत आणण्यासाठी तुमच्या सरकारने केलेल्या जलद कृतीबद्दल तुमचे प्रत्यक्ष आभार मानणे भाग्यच आहे. या भेटीबद्दल खूप खूप धन्यवाद. ही माझ्यासाठी आयुष्यभराची आठवण राहील.

# कोलकाताने उडवल्या चेन्नईच्या चिंधड्या!

## कोलकाताचा 8 विकेट्स आणि 59 चेंडू राखून अद्भुत विजय

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्स संघाने चेन्नईला चेपॉकवर अवघ्या १०३ धावांतच रोखलं. त्यानंतर अवघ्या १०.१ षटकात हे लक्ष्य पार करत कोलकाताने चेन्नईच्या चिंधड्या उडवल्या. कोलकाताने ८ विकेट्स आणि ५९ चेंडू राखून दणदणीत विजय मिळवला.**



ऋतुराज गायकवाड कोपऱ्याच्या दुखापतीमुळे उर्वरित हंगाम खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झाल्यामुळे महेंद्रसिंग धोनीने कर्णधारपद स्वीकारलं. मात्र धोनीचं नेतृत्वही चेन्नईचं नशीब बदलू शकलं नाही. चेन्नईने या लढतीसाठी राहुल त्रिपाठी आणि अंशुल कंबोज यांना संधी दिली. मात्र हे बदलही चेन्नईचं नशीब बदलू शकले नाहीत.डेव्हॉन कॉनवे-रचीन रवींद्र जोडीने सावध सुरुवात केली. मात्र चेन्नईच्या १६ धावा असताना ते दोघेही बाद झाले. यानंतर विजय शंकर आणि राहुल त्रिपाठी यांची जोडी जमली. विजय शंकरला दोन जीवदानंही मिळाली. वरुण चक्रवर्तीने विजय शंकरला बाद केलं तर सुनील नरिनने राहुलला त्रिफळाचीत केलं. यानंतर चेन्नईच्या फलंदाजांनी सपशेल लोटांगण घातलं. रवीचंद्रन अश्विन (१), रवींद्र जडेजा (०), इम्पॅक्ट प्लेयर म्हणून आलेला दीपक हुड्डा (०) यांनी निराशाच केली. महेंद्रसिंग धोनीकडून चाहत्यांना अपेक्षा होत्या पण तोही नरिनच्या फिरकीच्या जाळ्यात अडकला. धोनीने एका धावेचं योगदान दिलं. शिवम दुबेने एकाकी लढा देत नाबाद ३१ धावांची खेळी केली. दुबेच्या खेळीमुळे चेन्नईने कशीबशी शंभरी पार केली. कोलकातातर्फे नरिनने १३ धावांत ३ तर हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.१०४ धावांच्या लक्ष्यासमोर खेळताना क्विंटन डी कॉक आणि सुनील नरिन यांनी ४६ धावांची खणखणीत सलामी दिली. चेन्नईतर्फे पदार्पण करणाऱ्या अंशुल कंबोजने क्विंटनला बाद करत ही जोडी फोडली.

क्विंटनने १६ चेंडूत २३ धावा केल्या. नूर अहमदने नरिनला त्रिफळाचीत केलं. नरिनने १८ चेंडूत २ चौकार आणि ५ षटकारांसह ४४ धावांची वेगवान खेळी केली. अजिंक्य रहाणे आणि रिंकू सिंगने कोलकाताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. रहाणेने १७ चेंडूत २० तर रिंकूने १२ चेंडूत १५ धावांची खेळी केली. ऋतुराज गायकवाड कोपऱ्याच्या दुखापतीमुळे उर्वरित हंगाम खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झाल्यामुळे महेंद्रसिंग धोनीने कर्णधारपद स्वीकारलं. मात्र धोनीचं नेतृत्वही चेन्नईचं नशीब बदलू शकलं नाही. चेन्नईने या लढतीसाठी राहुल त्रिपाठी आणि अंशुल कंबोज यांना संधी दिली. मात्र हे बदलही चेन्नईचं नशीब बदलू शकले नाहीत.डेव्हॉन कॉनवे-रचीन रवींद्र जोडीने सावध सुरुवात केली. मात्र चेन्नईच्या १६ धावा असताना ते दोघेही बाद झाले. यानंतर विजय शंकर आणि राहुल त्रिपाठी यांची जोडी जमली.

विजय शंकरला दोन जीवदानंही मिळाली. वरुण चक्रवर्तीने विजय शंकरला बाद केलं तर सुनील नरिनने राहुलला त्रिफळाचीत केलं. यानंतर चेन्नईच्या फलंदाजांनी सपशेल लोटांगण घातलं. रवीचंद्रन अश्विन (१), रवींद्र जडेजा (०), इम्पॅक्ट प्लेयर म्हणून आलेला दीपक हुड्डा (०) यांनी निराशाच केली. महेंद्रसिंग धोनीकडून चाहत्यांना अपेक्षा होत्या पण तोही नरिनच्या फिरकीच्या जाळ्यात अडकला. धोनीने एका धावेचं योगदान दिलं. शिवम दुबेने एकाकी लढा देत नाबाद ३१ धावांची खेळी केली. दुबेच्या खेळीमुळे चेन्नईने कशीबशी शंभरी पार केली. कोलकातातर्फे नरिनने १३ धावांत ३ तर हर्षित राणा आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.

### दुबेच्या खेळीमुळे शंभरी पार

१०४ धावांच्या लक्ष्यासमोर खेळताना क्विंटन डी कॉक आणि सुनील नरिन यांनी ४६ धावांची खणखणीत सलामी दिली. चेन्नईतर्फे पदार्पण करणाऱ्या अंशुल कंबोजने क्विंटनला बाद करत ही जोडी फोडली. क्विंटनने १६ चेंडूत २३ धावा केल्या. नूर अहमदने नरिनला त्रिफळाचीत केलं. नरिनने १८ चेंडूत २ चौकार आणि ५ षटकारांसह ४४ धावांची वेगवान खेळी केली. अजिंक्य रहाणे आणि रिंकू सिंगने कोलकाताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. रहाणेने १७ चेंडूत २० तर रिंकूने १२ चेंडूत १५ धावांची खेळी केली. रवीचंद्रन अश्विन (१), रवींद्र जडेजा (०), इम्पॅक्ट प्लेयर म्हणून आलेला दीपक हुड्डा (०) यांनी निराशाच केली. महेंद्रसिंग धोनीकडून चाहत्यांना अपेक्षा होत्या पण तोही नरिनच्या फिरकीच्या जाळ्यात अडकला. धोनीने एका धावेचं योगदान दिलं. शिवम दुबेने एकाकी लढा देत नाबाद ३१ धावांची खेळी केली. दुबेच्या खेळीमुळे चेन्नईने कशीबशी शंभरी पार केली.

# मुलाच्या आठवणीत शिखर धवन भावूक

## गेल्या वर्षभरापासून धवन आणि मुलाचे बोलणेही झाले नाही

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भारतीय क्रिकेट संघाचा माजी सलामीवीर शिखर धवन आणि आयशा मुखर्जी यांचा घटस्फोट झाला आहे. त्यांच्या घटस्फोटानंतर मुलगा झोरावरचा ताबा आयशा मुखर्जीकडे आहे. अशात गेल्या काही वर्षांपासून धवन झोरावरला भेटण्यासाठी आणि त्याच्याशी बोलण्यासाठी आतुर आहे.**



परंतु, त्याचा फोन नंबर ब्लॉक केल्यामुळे त्याला मुलाशी संपर्कही साधता येत नाही. शिखर धवन, त्याचा नंबर ब्लॉक आहे हे माहित असूनही, दर ३-४ दिवसांनी नियमितपणे त्याचा मुलगा झोरावरला मेसेज करत असतो. एएनआय या वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत, शिखर धवनने आयेशा मुखर्जीपासून घटस्फोट आणि मुलगा झोरावरपासून वेगळे झाल्यानंतर त्याला झालेल्या भावनिक त्रासाबद्दल खुलासा केला. या मुलाखतीत शिखर धवनने खुलासा केला की, तो त्याला शेवटचे दोन वर्षांपूर्वी भेटला होता. तसेच गेल्या वर्षभरापासून धवन आणि मुलाचे बोलणेही झाले नाही.शिखर धवन म्हणाला, 'मला तो आनंदी आणि निरोगी हवा आहे. जरी मला ब्लॉक केले असले तरी मी त्याला दर ३-४ दिवसांनी मेसेज करतो. तो ते मेसेज वाचेल अशी मला अपेक्षा नाही. तो ते वाचत नसेल तर मला काही हरकत नाही, संपर्कात राहणे हे माझे काम आहे. मी हे करत राहीन.

"आपल्या ११ वर्षांच्या मुलाशी भावनिकपणे संपर्कात राहण्यासाठी धवन अध्यात्माकडे वळला आहे. शिखर धवन म्हणाला, "माझ्या मुलाला पाहून दोन वर्षे झाली आहेत, त्याच्याशी शेवटचे एका वर्षापूर्वी बोललो होतो. हे कठीण आहे, पण तुम्ही परिस्थितीबरोबर याच्याशी जगायला शिकता. मला त्याची आठवण येते. मी त्याच्याशी आध्यात्मिकरित्या बोलतो. मला असं वाटतंय की मी रोज त्याच्याशी बोलत आहे, त्याला मिठी मारत आहे. मी माझी ऊर्जेचा आध्यात्मिकरित्या वापर करत आहे. माझ्या मुलाला परत मिळवण्याचा हा एकमेव मार्ग आहे."शिखर धवन पुढे म्हणाला की, 'मला असं कायम वाटतं की मी त्याच्यासोबत आहे, त्याच्याशी बोलत आहे, त्याच्यासोबत खेळत आहे. जेव्हा मी ध्यान करायला बसतो तेव्हा मी कल्पना करतो की, माझा मुलगा आता ११ वर्षांचा आहे, पण मी त्याच्या आयुष्यातील फक्त अडीच वर्षे पाहिली आहेत.

### मला ब्लॉक केले असले तरी...

"आपल्या ११ वर्षांच्या मुलाशी भावनिकपणे संपर्कात राहण्यासाठी धवन अध्यात्माकडे वळला आहे. शिखर धवन म्हणाला, "माझ्या मुलाला पाहून दोन वर्षे झाली आहेत, त्याच्याशी शेवटचे एका वर्षापूर्वी बोललो होतो. हे कठीण आहे, पण तुम्ही परिस्थितीबरोबर याच्याशी जगायला शिकता. मला त्याची आठवण येते. मी त्याच्याशी आध्यात्मिकरित्या बोलतो.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
। दि. 12 एप्रिल 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# गडकोट किल्ल्यांचा वारसा जपणे सर्वांची जबाबदारी : आनंद देशपांडे

## पीसीसीओईमध्ये दुर्गविध उपक्रम उत्साहात संपन्न




। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यातील गडकोट किल्ल्यांचा वारसा जपणे आणि त्यांचे संवर्धन करणे ही फक्त सरकारची जबाबदारी नसून ते आपल्या सगळ्यांचे कर्तव्य आहे. याबाबत युवकांमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजित केलेला दुर्गवेध हा ऐतिहासिक वारसा जपणारा उपक्रम प्रशंसनीय आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या गडसंवर्धन समितीचे माजी सदस्य व इतिहास अभ्यासक आनंद देशपांडे यांनी केले.**




पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, आकुर्डी, पुणे येथील राष्ट्रीय सेवा योजना आणि समान संधी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने दुर्गवेध २.० हा ऐतिहासिक वारसा जपणारा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये गडकोट किल्ल्यांच्या प्रतिकृती बनवणे, चित्रकला, पोस्टर मेकिंग, कविता, पोवाडा, भारूड, वक्तृत्व आणि रील मेकिंग अशा विविध सांस्कृतिक स्पर्धा आणि डॉ. सचिन जोशी व अक्षय चंदेल यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. स्पर्धेचे बक्षीस वितरण आनंद देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, माजी नगरसेवक धनंजय काळभोर, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, विद्यार्थी कल्याण व विकास अधिष्ठाता डॉ. पद्माकर देशमुख, विद्यार्थी कल्याण व विकास उप अधिष्ठाता प्रा. राजकमल सांगोले, रासेयो कार्यक्रम अधिकारी संजय मापारी, रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी सचिन गिरवले, समन्वयक डॉ. शैलेन्द्र बन्ने, कार्यक्रम विद्यार्थी समन्वयक अपूर्वा मोरे, शांतनू माळी, चिराग जथे आदी उपस्थित होते.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी संघाचे अभिनंदन केले.



### विद्यार्थ्यांनी साकारल्या किल्ल्यांच्या प्रतिकृती

या किल्ले बांधणी स्पर्धेत प्रत्येकी सात विद्यार्थ्यांचा एक संघ अशा एकूण १४ संघांनी सहभाग घेतला होता. त्यांनी किल्ल्यांच्या प्रतिकृती अत्यंत कौशल्याने साकारल्या. किल्ले बांधणी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी तत्त्वांचा प्रभावी वापर करून ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारल्या. किल्ल्यांच्या वास्तुशिल्प, रचना आणि संरक्षणात्मक वैशिष्ट्यांचा सखोल अभ्यास करून, मॉडेल्समध्ये तटबंदी, बुरुज, खंदक, आणि प्रवेशद्वार याची अचूक नोंद केली. परीक्षक मंडळाने प्रथम क्रमांक टीम शिलेदार, द्वितीय क्रमांक टीम स्वराज्य, तृतीय क्रमांक टीम सात मावळे यांची निवड केली. तसेच प्रेक्षकांच्या मतदानानुसार प्रथम क्रमांक टीम सह्याद्री प्रतिष्ठान, द्वितीय क्रमांक टीम अभेद्य सेना आणि तृतीय क्रमांक टीम स्टोन गार्डियन्स यांची निवड केली.

# Moaraya Shikshan Sanstha Computer Vacation Batch 2024-25




## Second Batch

From 5th April 2025

Duration One Month

1 Hour /day

Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students

'C' Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

'C++' Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

Contact: 8087706100/ Computer Lab

Registration started

Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
# ADMISSIONS
OPEN

## PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

**42** YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

**50** FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now

86687 55826

98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

BBA



**Bachelor of Business Administration**

BCA



**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
CREATIVE
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
STAR
RANKING
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com